# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः27.03.2025** **वारःगुरुवार**

---

1. बँकिंगविषयक कायदे सुधारणा विधेयक 2024 संसदेत मंजूर
2. भारताच्या दूरदर्शी विकासासाठी, अमेरिकेसोबत व्यापार संबंध अधिक भक्कम करण्यासाठी गहन चर्चा- परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर यांची माहिती
3. केंद्रीय कोळसा मंत्रालयाच्या वतीनं आज कोळसा खाणींचा लिलाव आणि
4. खेलो इंडिया पॅरा स्पर्धांचा आज समारोप, महाराष्ट्र 15 सुवर्ण, 16 रौप्य आणि 23 कास्यपदकांसह पाचव्या स्थानावर,

**विधेयक**

बँकिंगविषयक कायदे सुधारणा विधेयक 2024 काल राज्यसभेत मंजूर झालं. लोकसभे ने या आधीच हे विधेयक मंजूर केल असून त्यात भारतीय रिझर्व बँक अधिनियम 1934 यासह एकंदर 5 विविध बँकिंग विषयक कायद्यामध्ये सुधारणा आणि संशोधन करण्यात येणार आहे. बँक खात्यावर वारस म्हणून एकाऐवजी 4 नावं नोंदता यावी अशी तरतूद या विधेयकात आहे. तसच बँकांच्या लेखा परीक्षकांचं मानधन ठरवण्याचा अधिकार बँकांना देणं, इत्यादी सुधारणाही त्यात समाविष्ट आहेत.

या विधेयकबाबत बोलताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या, की देशातले बँकिंग क्षेत्र अधिक भक्कम करण्यासाठी सरकारने आतापर्यंत अनेक सुधारणा केल्या आहेत 2014 मध्ये बँकिंग क्षेत्र दबावाखाली होत पण सरकारने सत्तेवर आल्यावर बँकिंग क्षेत्राचा पायाभूत प्रणाली अधिक सक्षम बनवली आणि त्यामुके बँकांची आर्थिक स्थिती  सुधारली. 2014 पासून सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांमध्ये 4 लाख जणांना रोजगार मिळाला असून, बँकांची कर्ज मुद्दामून बुडवणाऱ्या व्यक्तींवर कर्ज वसुलीसाठी कडक कारवाई करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे असही सीतारामन यांनी यावेळी सांगितल.

लोकसभेत काल त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक 2025 मंजूर झालं. त्यानुसार गुजरातमधल्या आणंद इथल्या ग्रामीण व्यवस्थापन संस्थेचं नाव बदलून त्रिभुवन सहकारी विद्यापीठ असं होणार असून संस्थेला विद्यापीठाचा तसंच राष्ट्रीय महत्वाच्या संस्थेचा दर्जा दिला जाणार आहे. या संस्थेत सहकार क्षेत्रातील संस्थाना तांत्रिक आणि व्यवस्थापनविषयक प्रशिक्षण दिल जाणार आहे.

अमूल या सहकारी कंपनीची सुरुवात करणाऱ्या त्रिभुवनभाई पटेल यांचं नाव या विद्यापीठाला दिलं जाणार असल्याचं केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी सांगितलं. ते म्हणाले की ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी तसच छोटे उद्योग आणि स्वयं रोजगारच्या विकासाला चालना देण्यासाठी हे विधेयक आणि विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय जास्त सहाय्यकारी होईल तसच सहकार क्षेत्रात संशोधन आणि नवनिर्मितीला प्रोत्साहन मिळेल.

**करार**

संरक्षण मंत्रालयानं काल भारत फोर्ज आणि टाटा एडवान्सड सिस्टिम्स या दोन कंपन्यांशी अत्याधुनिक तोफा आणि त्यांना वाहून नेणाऱ्या खास वाहनांच्या खरेदीचा करार केला. नवी दिल्लीत केलेल्या या कराराचं मूल्य 6 हजार 900 कोटी रुपये आहे. याबरोबरच संरक्षण मंत्रालयाने वर्तमान आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये 1 लाख 40 हजार कोटी रुपयांच्या संरक्षणविषयक खरेदीचा टप्पा गाठला आहे.

**वैष्णव**

केंद्र सरकारच्या सत्यशोधक पथकाने गेल्या तीन वर्षात देशात दीड हजारपेक्षा जास्त खोट्या बातम्या प्रसारित झाल्याचा शोध लावला आहे. केंद्रीय महाइति आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत सांगितल की यासंदर्भात 72 हजारांपेक्षा जास्त तक्रारी पात्र सूचना कार्यालयाला मिळाल्या असून, त्यांच सत्यता शोधक पथक बाटमयांच्या सत्यतेचा तपास करू त्याबद्दलची माहिती आपल्या सोशल मीडियावरुंन देते. नागरिकांनी सरकारशी संबंधित प्रसारित होणाऱ्या बातम्यांविषयी आपल्या तक्रारी असल्यास 87 99 71 12 59 या व्हॉट सप क्रमांकावर अथवा पत्र सूचना कार्यालयाच्या संकेत स्थळावर पाठवाव्यात अस आवाहन अश्विनी वैष्णव यांनी यावेळी केल.

**एस जयशंकर**

भारत आणि अमेरिका दरम्यान व्यापार संबंध अधिक मजबूत करण्यासाठी गहन चर्चा करण्यात येत असून ऊर्जानिर्मितीक्षेत्रात दोन्ही देशांचे संबंध अधिक दृढ आणि स्थिर करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. भारताच्या दूरदर्शी विकासासाठी ते आवश्यक असल्याच परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी काल सांगितल. नवी दिल्लीत एशिया सोसायटीतर्फे आयोजित विशेष संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. अमेरिकेच्या दक्षिण आणि मध्य आशिया विभागासाठीच्या व्यापार प्रतिनिधी ब्रेंडन लींच या सध्या पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर आल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही माहिती दिली. अमेरिकेच्या ट्रॅम्प सरकारच्या काळात दोन्ही देशा दरम्यानच्या संरक्षण क्षेत्रातील संबंधांमध्येही अधिक वाढ होईल असा विश्वास जयशंकर यांनी यावेळी व्यक्त केला. 2023 मध्ये भारत आणि अमेरिका दरम्यान वस्तु आणि सेवा संदर्भातील व्यापार 190 अब्ज डॉलर्स होता आणि अमेरिका भारताचा सर्वात मोठा द्विपक्षीय व्यापार भागीदार देश ठरला. तसच 2023-24 या वर्षात अमेरिकेने भारतात 5 अब्ज डॉलर्सची प्रत्यक्ष गुंतवणूक करत भारताचा तिसरा सर्वात मोठा विदेशी गुंतवणूक भागीदार देश ठरला असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

**कोळसा लिलाव**

केंद्रीय कोळसा मंत्रालयाच्यावतीने आज कोळसा खाणींच्या लिलावांचा 12 वा टप्पा सुरू करणार आहे. यामध्ये लिलावासाठी प्रस्तावित 13 कोळसाखाणी पूर्णतः आणि 12 खाणी अंशतःशोधून काढण्यात आल्या आहेत. या लिलावाचा उद्देश देशी तसच परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करून ऊर्जा आणि उद्योग क्षेत्रात भारताच्या आत्मनिर्भरतेला अधिक बळ मिळवून देण हा आहे.

**अधिवेशन**

विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन काल संस्थगित करण्यात आलं. या अधिवेशनात 19 बैठका झाल्या आणि एकंदर 146 तास कामकाज झालं, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. या पुढील म्हणजेच पावसाळी अधिवेशन 30 जूनपासून सुरू होणार आहे. तीस लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर 6 टक्के कर लावण्याचा निर्णय घेतला होता, मात्र मंत्रीमंडळात झालेल्या चर्चेनुसार हा कर लावला जाणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांनी विधानपरिषदेत एका प्रश्नाचं उत्तर देताना सांगितलं. सर्व सरकारी वाहनं तसंच मंत्र्यांची वाहनं टप्प्याटप्प्यानं इलेक्ट्रिक करण्यात येतील आणि आमदारांना यापुढे फक्त इलेक्ट्रिक वाहनांसाठीच कर्ज दिलं जाईल असंही त्यांनी सांगितलं. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या धर्तीवर राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षाही वर्णनात्मक पद्धतीनं घेण्याचा निर्णय कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नाही असं मुख्यमंत्र्यांनी काल विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. ही परीक्षा पद्धती विद्यार्थ्यांच्या हिताची आहे, असं ते म्हणाले.

**रहाटकर**

विवाहपूर्व समुपदेशनासाठी देशातील 11 राज्यांमध्ये आतापर्यंत 23 केंद्र उभारण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी काल आकाशवाणीला दिली. अशी समुपदेशन केंद्र सरकारी कार्यालयांमध्ये उघडण्यात येतील, त्यांच्यावर जिल्हा प्रशासन किंवा पालिकांची देखरेख राहील. विवाहासंबंधी सामाजिक मानसशास्त्र आणि वर्तनाचे पैलू यांच्याविषयी विवाह-इच्छुक मुलामुलींना समुपदेशन या केंद्रात देण्यात येईल. संयुक्त कुटुंब पद्धती लयाला जात लहान कुटुंबं निर्माण होत आहेत, त्यामुळं वैवाहिक तंटे, घटस्फोट, अपयशी विवाहांची प्रकरणं वाढत असल्याचंही रहाटकर यांनी सांगितलं.

**निदर्शने**

हमास आणि इस्राइल यांच्यात सुरू असलेल युद्ध तत्काळ थांबवाव या मागणीसाठी काल शेकडो पॅ लेस्टाईन नागरिकांनी गाजा पट्टीच्या उत्तर भागात निदर्शने केली. हातात युद्धाच्या विरुद्ध फलक झळकवत आणि घोषणा देत त्यांनी ही निदर्शने केली. गेले 17 महीने चाललेल्या या युद्धमुळे गाजा पट्टी पूर्णतः उद्ध्वस्त  झाली आहे. इस्राइलने आपल्या बंधकांना मुक्त करण्यासाठी हमासवर दबाव आणण्यासाठी या महिन्याच्या 2 तारखेपासून  इस्राइलने सर्व प्रकारच साहाय्य बंद केल असून त्यामुळे मानविय दृष्टिकोनातून नागरिकांची स्थिति अधिक गंभीर झाली आहे.

**खेलो इंडिया**

नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धांच्या भारतोलन क्रीडाप्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी 2 सुवर्ण, 2 रौप्य आणि 1 कास्य अशी एकंदर 5 पदकं पटकावली आहेत. दिनेश बागडेनं सुवर्णपदकाला गवसणी घालत कालचा दिवस गाजवला. नेमबाजीत महाराष्ट्रानं 2 सुवर्ण आणि 1 रौप्य पदक जिंकून तिसरं स्थान प्राप्त केलं. स्वरूप उन्हाळकर आणि सागर कटाळेनं सुवर्णपदकं जिंकली. सर्वसाधारण तृतीय विजेतेपदकाचा करंडक स्वरूप उन्हाळकर यानं स्वीकारला. या स्पर्धेत महाराष्ट्र 15 सुवर्ण, 16 रौप्य आणि 23 कास्यपदकांसह पाचव्या स्थानावर राहिला.  दरम्यान, या स्पर्धांचा आज संध्याकाळी समारोप होत आहे. केंद्रीय युवक आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत हा सांगता समारंभ होत असून, गेले 8 दिवस चाललेल्या या क्रीडा  स्पर्धांमध्ये देशभरातील 13 शे दिव्यांग खेळाडू सहभागी झाले होते.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.